# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 12.02.2015 (का.प.क्र.-11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिनांक 12/02/2015 (का.प.क्र.11) रोजी मा.सभापती **श्री.विजय वाघचौरे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.40 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश पवार, नगर सचिव, श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
02. स.स.श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे
03. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
04. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
05. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
06. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी
07. स.स.श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली
08. स.स.श्री.संजय सांडु चौधरी
09. स.स.श्री.जहांगीर खान अब्बास खान
10. स.स.सौ.प्रिती संतोष तोतला
11. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा

श्री.काशिनाथ कोकाटे :समांतर जलवाहिनी संदर्भात दोन वेळेस मा.सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करण्यात आली. तद्नंतर दुसऱ्या दिवशी मा.महापौरांनी समिती गठीत केली. समितीद्वारे प्रश्न सुटणार नाही. हे त्यावेळेसही सांगण्यात आले होते. सिडकोचा भाग महानगरपालिकेमध्ये हस्तांतरीत होण्यापुर्वी सिडकोला व्यवस्थित पाणीपुरवठा होत होता. समांतरच्या माध्यमातुन पाण्याचा प्रश्न सुटेल म्हणुन आश्वासन दिले होते. प्रत्येक दिवशी पाणी देवू, दिड वर्षानंतर 24 तास नळाला पाणी देण्यात येईल म्हणुन सांगण्यात आले. 240 पाणीपुरवठयाचे कर्मचारी अधिकारी समांतरला हस्तांतरण केलेले आहे. सध्या पाण्यासाठी नागरीक हैराण आहे. गेल्या 12 दिवसापासून सिडको येथील एन-5 च्या वॉटरपंप येथे 250 एमएम व्यासाची लाईनमधुन पाणी मोठया प्रमाणात वाहत आहे. 200 नळ कनेक्शन अधिकृत आहे त्या ठिकाणी पाण्याच्या हंडयासाठी त्रासलेले आहे. नळाचे दुरूस्तीचे काम तात्काळ करू शकत नसेल तर समांतरच्या कंपणीचा उपयोग काय? पाणी मोठया प्रमाणात वाया जात आहे. 15 - 15 दिवस तक्रारी सोडविण्यात येत नाही. ड्रेनेज आणि पिण्याचे पाणी समांतर लाईन फुटलेली असतांना त्या ठिकाणी दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येत नाही. जायकवाडीतुन जे पाणी येते ते जाते कुठे हा प्रश्न आहे. तक्रारींची दखलच घेत नाही. कंपणीची हाकलपट्टी करण्यात यावी. संबधीत अधिकारी यांना सभागृहात बोलविण्यात यावे. मा.स्थायी समितीने निर्णय घेण्यात यावे की, समांतरचा करार रद्द करण्यात यावा. सक्षम अधिकारी, कर्मचारी असतांना पाणीपुरवठा हस्तांतरण केलेला आहे. कुठल्याही प्रकारची तडजोड या ठिकाणी करण्यात येऊ नये, अशी नम्र निवेदन या ठिकाणी करण्यात येते.

श्री.त्र्यंबक तुपे :स.सदस्य यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या योग्य आहे. समांतरच्या माध्यमातुन शहरात पाणीपुरवठा व्यवस्थित होणे आवश्यक होता परंतु ते झालेले नाही. मा.सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभेत समांतरचा विषय चर्चेला येत आहे. अनेक मागण्या, भावना कंपणीपुढे मांडण्यात आल्या. परंतु विषय गंभिरतेने घेतलेला दिसुन येत नाही. मनपाच्या अधिकाऱ्यांनी लाईन दुरूस्तीची कामे समांतरच्या माध्यमातुन घेण्यात येईल म्हणुन सांगण्यात आले. 15 तारखेच्या आत दुरुस्तीचे आदेश कंपणीने हाती घ्यावे म्हणुन मा.पालकमंत्री यांनी दिली होती परंतु कामे हाती घेण्यात आली नाही. 5.25 रूपये प्रिमियम दिले जाते. हार्डोलिक मॉडेल तयार करण्याचे काम चालू होते असे दोन महिण्यापुर्वी सांगण्यात आले होते. परंतु आज परिस्थिती काय आहे ते सांगण्यात येत नाही. कंपणीच्या माध्यमातुन कामे का करण्यात आली नाही, मा.पालकमंत्र्यांच्या आदेशाचे पालन झाले नाही. याबाबत खुलासा सभागृहात करण्यात यावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी : 5.25 कोटी का थांबवले किंवा नाही.

श्री.मीर हिदायत अली :वार्डामध्ये ड्रेनेज आणि पिण्याचे पाणी मिक्स होत आहे सात फुटाचा पाईपचा तुकडा अद्यापपर्यंत टाकण्यात आलेला नाही. एसी पाईप वापरण्यास मनाई असतांना त्या ठिकाणी एसी पाईप टाकण्यात येत आहे. कंत्राटदाराचा ब्लॅकलिस्ट का करण्यात येत नाही. शहर अभियंता यांनी मा.महापौरांच्या बैठकीच्या समवेत आदेश दिले होते की, 5.25 कोटी रूपये कंपणीचे थांबविण्यात यावे. परंतु त्याचे पालन करण्यात आले नाही.

श्री.अनिल जैस्वाल :सिडको हडको भागात गेल्या 20 दिवसांपासून पाणी वेळेवर येत नाही. तसेच 30 मिनीट पाणीपुरवठा होत आहे. नागरीकांना यामुळे त्रास भोगावा लागत आहे. दुरूस्तीचे कुठलेही काम करण्यात येत नाही. तर कंपणी काम का करत नाही? खुलासा करण्यात यावा

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :कंपणीला देण्यात येणारे प्रतिमहा पेमेंट थांबविण्यात यावे.

श्रीमती फिरदोस फातेमा खानः कांचनवाडी ते ज्युबली पार्क येथील 40 कोटी रूपयेची पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. लपवुन ठेवले होते. या 40 कोटी रूपये लाईनचा करारामध्ये उल्लेख नाही. वॉटर युटिलिटी कंपणीला सदरची 40 कोटीची पाईपलाईन गिफ्ट दिलेली आहे का? हार्डोलिक डिझाइन करण्यास विलंब लागणार असल्यास करार हार्डोलिक डिझाइन झाल्यानंतर करणे योग्य होते.

श्रीमती प्रिती तोतला :केळीबाजार कॉंक्रीट रस्ते आहे. डी.आय.पाईप खाली करावयाचे 4X4 मोठे काम, श्री.मुजूमदार म्हणतात मंजूरीला पाठवावे लागेल. रस्ते सिमेंट क्रॉंक्रीटीकरणाचे काम हाती घेतल्यानंतर कंपणीला पाईपलाईन टाकण्यासंदर्भात वारंवार पाठपुरावा केलेला आहे परंतु कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. रस्ते पुन्हा खोदावे लागतील त्यामुळे पुन्हा रस्त्याचे नुकसान होते. समांतर आल्यापासून मोटार लावुनही तळघरात पाणी येत नाही. बरेच नगरसेवक एन-5 टाकीजवळ असतात त्यांच्या तेथे डयुटीज आहे का. पंखा चालु, पाणी बंद करून दुसरीकडे वळविले. 1 वर्ष झाले टेंडर होऊन उपअभियंता यांनी 5 वेळा पाहिले.

श्री.संजय चौधरी :पाईप लाईन दुरूस्तीचे कामे समांतर कडुन करण्यात येत नाही. ड्रेनेज लाईनचे पाणी पिण्याच्या पाण्यामध्ये येत आहे. संबधित अधिकारी यांनी पहाणी केलेली आहे. मागील सभेमध्ये सदरील लाईन दुरूस्तीचे आश्वासन दिले होते.

मा.सभापती :स.सदस्यांनी समांतरबाबत गंभिर प्रश्न मांडलेले आहे. त्याबाबत संबधीत अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

श्री.मीर हिदायत अली :आजच्या बैठकीमध्ये पाणीपुरवठया संबधी अधिकारी उपस्थित नाही.

श्री.फालक (अभियंता) :श्री.कोल्हे, कार्यकारी अभियंता परवानगी घेवुन सुट्टीवर गेलेले आहेत. पाणीपुरवठा वितरणाबाबतचे अधिकार श्री.ख्वाजा, उप अभियंता यांचेकडे आहे.

मा.सभापती :अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीबाबत सभापती यांची परवानगी घेतलेली नाही. आजच्या सभेमध्ये जे अधिकारी गैरहजर आहेत त्यांचेवर कारवाई करण्यात यावी.

श्री.त्र्यंबक तुपे :नागरीकांना मुद्दामहुन त्रास देण्याचा हेतु आहे का? दुरूस्तीचे कामे थांबविण्यात आली आहे. समांतरच्या माध्यमातुन सदरील कामे होणे आवश्यक होते.

श्री.फालक (अभियंता) :मा.पालकमंत्री सोबत 26.1.2015 ला बैठक झाली. दिनांक 15.02.2015 तारखेपर्यंतची डेडलाईन समांतरला दिलेली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :समांतरच्या अधिकाऱ्यांकडे का? प्रशासनाकडे, प्रश्न कोणापुढे मांडायचा हा प्रश्न आहे? नागरीकांना मुद्दामहुन वेठीस धरण्याचे काम कंपणी करत आहे.

श्री.मीर हिदायत अली :कंपणीला टर्मीनेटची नोटीस दिली म्हणुन सांगण्यात आले, परंतु संबधीत विभागाकडुन माहिती घेतली असता सदरील पत्रामध्ये टर्मीनेटचा उल्लेख नाही. मा.महापौरांचे, मा.पालकमंत्री यांचे आदेश मानण्यात आले नाही.

प्र.उपअभियंता (श्री.पद्मने) :पाणी वितरण 15 दिवसांमध्ये विस्कळीत झालेले आहे कंपणीशी समन्वय साधुन पाणी वितरण सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. तरीही कंपणीकडुन पाणीपुरवठा सुरळीत झालेला नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :सदरील विषय गंभिर आहे वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत खुलासा घ्यावा लागेल. 12 लाख लोकांचा प्रश्न टोकाची भूमिका घ्यावी लागेल.

श्री.त्र्यंबक तुपे : समांतरला पाणीपुरवठा हॅन्ड ओव्हर केलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील अभियंता यांचेकडे आता कुठले काम दिलेले आहे याचा खुलासा झाला पाहिजे. अभियंता यांनी महानगरपालिकेचे हित जोपासणे आवश्यक आहे. मा.आयुक्तांकडे बसून निर्णय घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :गेल्या तीन वर्षापुर्वी कायद्यात नमुद तरतुदींनुसार कामकाज पार पाडत होते, प्रॅाटोकॉलनुसार स्थायी समिती सभेस आयुक्त उपस्थित राहत असे. नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रोटोकॉल पाळायचा का नाही, त्यावर निर्णय घ्यायचा हा महत्वाचा निर्णय आहे. सध्या सभागृहात उपस्थित अधिकाऱ्यांकडुन या विषयावर या सभागृहामध्ये मत मिळेल असे वाटत नाही. या ठिकाणी आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन अतिरिक्त आयुक्त आहे परंतु त्यांना अधिकार आहे का? अधिकार नसल्याने कुठल्याही प्रकारचा निर्णय ते घेऊ शकत नाही. माझे स्पष्ट मत आहे की, मा.आयुक्तांचा वाटत असेल की, मी प्रोटोकॉलमध्ये बसत नाही, स्थायी समितीच्या बैठकीस जाण्याची गरज नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांना गरज नाही तर आपल्याला जनतेने निवडूण दिलेले आहे, जनतेचे सेवक आहे. म्हणुन सर्व प्रॅाटोकॉल बाजुला ठेवुन त्यांच्या दालनात जाऊन बैठक घेण्यात यावी. समांतरच्या पाण्याचा प्रश्न आज निकाली निघालाच पाहिजे. 100 एमएलडी पाणी जाते कुठे? या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :अतिरिक्त आयुक्तांना प्राधिकृत केलेले आहे त्यांना अधिकार आहे का नाही याचे उत्तर देण्यात यावे. सभागृहात निर्णय होत नसेल तर उपयोग काय? अतिरिक्त

आयुक्त यांना अधिकार नसेल तर सभागृहात तळमळीने भुमिका मांडतो, नागरीकांच्य समस्या मांडतो त्या न मांडलेल्या बऱ्या. महानगरपालिकेच्या हिताचे निर्णय घेतले गेले पाहिजे. मा.आयुक्तांनी सभेमध्ये येणे महत्वाचे आहे. अतिरिक्त आयुक्त यांना अधिकार आहेत का? खुलासा करण्यात यावा. अतिरिक्त आयुक्त यांना अधिकार का दिले नाही. कंपणीला काय पत्र पाठविले याबाबतची माहिती देण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :अधिकार काय आहेत माहिती देण्यात यावी.
(याच वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

श्री.त्र्यंबक तुपे :निर्णय घेण्याचा अधिकार असेल तर निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती :अतिरिक्त आयुक्त यांना कुठले अधिकार देण्यात आलेले आहे. खुलासा करण्यात यावा.

मा.अतिरिक्त आयुक्त :मा.आयुक्तांच्या वतीने स्थायी समितीची बैठक अतिरिक्त आयुक्त यांनी अटेंन्ड करावी असा आदेश आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :अधिकार आहे किंवा नाही ऐवढाच खुलासा करण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे, श्री.सुरेंद्र कुलकर्णी :अधिकारबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.अतिरिक्त आयुक्त :मा.स्थायी समितीचे मोठे अधिकार आहेत. त्यावर मी रूलिंग करणे हे अपेक्षित नाही आणि कायद्याला अनुसरून नाही. मा.स्थायी समिती जे निर्णय घेईल ते मा.आयुक्तांपुढे पुढील कार्यवाहीसाठी ठेवण्यात येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :अतिरिक्त आयुक्त म्हणुन स्थायी समितीच्या सभा अटेंन्ड केलेल्या आहेत त्यातील किती मुद्दयांवर निर्णय घेतलेले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन असतांना किती मुद्यांवर निर्णय घेतलेला आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.अतिरिक्त आयुक्त :पाण्याच्या प्रश्नाबाबत मी स्वत: गंभिर आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :गंभिर असता तर पाण्याचा प्रश्न सोडविला असता. शहराचा विकास करायचा असेल तर चांगले काम करावे लागेल.

मा.सभापती :दोन दिवसामध्ये मा.आयुक्तांशी भेट घेऊन मागील स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयावर कोणती कार्यवाही झाली. याबाबत माहिती देण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :कंपणीचा करार रद्द करण्याची शिफारस स्थायी समितीने करावी व मा.सर्वसाधारण सभेला पाठवावे. अशी विनंती आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :सभापती या नात्याने शिफारस करण्यात यावी.

श्री.मीर हिदायत अली :समांतरला सव्वा पाच कोटी रूपये देण्यात येतात त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

मुख्य लेखाधिकारी :5.25 कोटी बंद केले आहे. सप्टेंबर,ऑक्टाबर,नोंव्हेबरचे 15 कोटी रूपये ऑलरेडी देण्यात आलेले आहे. परंतु त्यानंतर देण्यात आलेला नाही. सव्वा पाच कोटी रूपये देण्यात आलेले नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :लिकेजेस दुरूस्त करण्यात यावे, घाण पाणी येऊ नये, शहरवासीयांना वेळेवर पाणी मिळावे, नविन कामे व्हावे हा उद्देश आहे. नागरीकांचे प्रश्न सुटले पाहिजे. गळती थांबवावी. 15-17 कोटींचा प्रश्न आज अदा काय काय करणार, पैसे नाही तर काम ही नाही. यात निर्णय व्हावा.

श्री.मीर हिदायत अली :दिनांक 15 पर्यंत लिकेजेसचे कामे झाली नसल्यास 16 तारखेला स्थायी समितीची सभा घेऊन काम रद्द करण्यात यावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :15 कोटींचा खुलासा करावा.

मा.अतिरिक्त आयुक्त :कंपणीला देण्यात आलेले पत्र वाचुन दाखविण्यात यावे.

(याच वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

श्री.काशिनाथ कोकाटे :पत्र वाचुन दाखविण्यात यावे.

श्री.फालक (अभियंता) :समांतरला प्रशासनातर्फे देण्यात आलेले पत्र सभागृहात वाचुन दाखविण्यात येते.

(इंग्रजी भाषेतील पत्र सभागृहात वाचून दाखविण्यात येते.)

श्री.मीर हिदायत अली :नोटीस ही श्री.सुशिल शेट्टी यांना देण्यात आलेली आहे ते कोण आहे.

श्री.फालक (अभियंता) :श्री.सुशिल शेट्टी मेन कन्सेशनर मेंबर आहेत, हे काम करीत आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :10 फेब्रुवारी पर्यंत पाईप टाकण्याचे काम सुरू करावे असे नोटीसमध्ये नमुद केलेले होते. काम सुरू न केल्यास यापुढे कंपणी विरोधात कोणती कार्यवाही करणार?

श्री.काशिनाथ कोकाटे :समांतरचे भुमिपुजन किती तारखेला झाले खुलासा करण्यात यावा. एजन्सीने काम सुरू न केल्यामुळे प्रशासनाकडुन किती वेळेस पत्रव्यवहार व्यवहार करण्यात आला? ॲग्रीमेंट करतांना संबधीत मेन कन्सेंशन मेंबर यांनी महानगरपालिकेबरोबर करार केलेला आहे का?

श्री.फालक (अभियंता) :करारावर त्यांच्या स्वाक्षरी आहेत. 10 फेब्रुवारीचे पत्रावर मा.आयुक्त यांचे स्वाक्षरी आहे. 23 ऑगष्ट 2014 रोजी उद्‌घाटन झाले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :कंपणीकडुन अंमलबजावणी करून घेतली पाहिजे. पालकमंत्र्यांनी दिलेल्या सूचनेकडे लक्ष दिले पाहिजे.

श्री.त्र्यंबक तुपे :मा.पालकमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन झाले पाहिजे. मुद्दामहुन जनतेला वेठीस धरण्याचे काम कंपणीकडून चालु आहे का?

श्री.फालक (अभियंता) :या पार्श्वभुमिवर ज्या काही कंन्सेशनर इव्हेंट डिफॉल्ट झालेले आहेत एकत्रित करून नोटीस देण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :कामासाठी अजुन वाट बघायची का?

मा.सभापती :याबाबतीत मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.अतिरिक्त आयुक्त :10 तारखेला काम सुरू केले पाहिजे परंतु अद्यापही काम सुरू केलेले नाही. हे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे ताबडतोब काम सुरू झाले पाहिजे. काम सुरू न करण्यामागचे कारणांचा शोध प्रशासनातर्फे घेतला जाईल. जी कायदेशिर कार्यवाही अपेक्षित आहे. ती करण्यात येईल.

(याच वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात)

श्री.त्र्यंबक तुपे :शहराला वेठीस धरण्याचे काम चालु आहे. दोन दिवसात काम चालु होईल म्हणुन लेखी देण्यात यावे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :चेतक घोडा चौकातील चेतक घोडा प्रतिकृती तयार आहे चबुतऱ्याच्या काम बाकी आहे. त्या कामाअभावी प्रतिकृती बसविण्याचे काम प्रलंबित आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :प्रलंबित चबुतऱ्याचे काम लवकर करण्यात यावे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावे.

कार्य.अभियंता(श्री.सिकंदर) :चेतक घोडयाचे काम झालेले आहे. चबुतऱ्याचे काम चालु आहे. आठवडयामध्ये संपुर्ण काम करण्यात येईल.

श्री.संजय चौधरी :राज्य शासनाने वैयक्तिक शौचालय योजनेसाठी बीपीएल नागरीकांसाठी 35 कोटी रूपये मंजूर केलेले आहे. संबधीत अधिकारी यांनी एलजीपीला डिपॉझीट द्यावे लागेल म्हणुन सांगण्यात आले. याबाबत माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता(श्री.अफसर सिद्दीकी) : घरोघरी वैयक्तिक स्वच्छतागृह बांधण्याकरीता प्रोजेक्ट डायरेक्टर मार्फत डिपीआर तयार करून घेण्यात आला होता त्यानुसार सर्वेक्षण करून लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. 18054 लाभार्थी शोधुन काढण्यात आलेले आहे. नवबौध्द घटक आणि अनुसूचित जातीसाठी ही योजना आहे. 37 कोटीच्या डिपीआरला शासनाने मान्यता दिलेली आहे. डिपीआरची तांत्रिक तपासणी एमजीपी नोडल एजन्सी मार्फत करून घेण्याची सांगण्यात आले. एमजीपीसह पत्रव्यवहार करून छाननीपोटी 30 लाख रूपये भरण्यास सांगण्यात आले होते. त्यानुषंगाने संचिका सादर करण्यात आली होती. लेखा विभागाने मुद्दा काढण्यात आला की, वैयक्तिक शौचालयासाठी 12000/- रूपये वैयक्तिक नळ कनेक्शनसाठी 4000/- रूपये होते. सदर नळ कनेक्शनसाठी पीपीपी विभागाद्वारे 9000 रूपये भरून करू शकतात. 30 लाखाचे अनुदान हे परत शासनाकडुन मिळणार आहेत. सहा महिणेपुर्वी 37 कोटीची मंजूरी झालेली आहे.

कार्य.अभियंता(श्री.अफसर सिद्दीकी) :प्रत्येकी नळ कनेक्शनसाठी 4000/- रूपये शासनाकडुन मिळणार आहे. 5000/- ला एक्झमंशन देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

मा.सभापती :मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्य लेखाधिकारी :संचिका मंजूरीनंतर बील लेखा विभागात पाठविण्यात यावे त्यानंतर बिल अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :कार्यकारी अभियंता श्री.कोल्हे यांनी चर्चा करून तात्काळ संचिका लेखा विभागात पाठविण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती फिरदोस फातेमा :स्वाईफ फ्ल्यु बाबत प्रशासनातर्फे कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे :डासांचे प्रमाण वाढलेले आहे. फवारणीबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.मीर हिदायत अली :फवारणी आणि फॉगींगचे काम पुर्णपणे बंद आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : स्वाईन फ्ल्यु बाबत टिमची स्थापना केलेली आहे नोडल अधिकारी म्हणुन डॉ.राणे यांची नेमणुक केलेली आहे. सर्वे करून संशयीत रूग्ण आढळल्यास टॅमीफ्ल्यु औषध दिले जाते. घाटीमध्ये स्वाईन फ्ल्युचे विशेष कक्ष सुरू केलेले आहे. महानगरपालिकेतर्फे नियंत्रण यंत्रणा सुरू केलेली आहे. शहरातील परिस्थिती नियंत्रणात आहे. बॉम्बे मर्केलटाईलचा बँकेचा कर्मचारी मुंबई येथे कामानिमित्त गेला होता. तेथुन परतल्यावर त्यास स्वाईन फ्ल्युची लागण झाल्याचे निष्पन्न झाल्यावर खाजगी लॅबद्वारे स्वाईन फ्ल्युची लागणमुळे मृत्यु झाला. यानंतर त्याच्या संपर्कात असलेल्या नातेवाईक व बँक येथील कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. परिस्थिती नियंत्रणात आहे.

श्री.संजय चौधरी :फॉगींगची फवारणी निरंतर करता येते का?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : ज्या ठिकाणी डेंग्यु सदृश आढळुन येतो त्या ठिकाणी आजुबाजूला 50 घरे फॉगीग करणे आवश्यक आहे. नियमित फॉगीग फवारणी असु नये. केमीकलमुळे आरोग्याला त्रास होण्याचा धोका असतो.

श्री.त्र्यंबक तुपे :डासांची उत्पत्ती वाढली आहे. फवारणी नियमित केली जाते का? तसेच संबधीत कंत्राटदारांचे पेमेंट केले जाते का? जनजागृतीचे काम करण्यात यावे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : शहारात विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. फवारणीबाबत बायलॉजिस्ट खुलासा करतील. फवारणीच्या कामाचे टेंडर काढण्यात आले हाते परंतु ते रिंग झाल्याचा संशय आल्याने रद्द करण्याबाबत संचिका पुटअप केलेली आहे. एका कंत्राटराला ब्लॅक लिस्ट करण्यात आलेले आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :टेंडरची प्रोसेस लवकरात लवकर करण्यात यावी.

मा.सभापती :टेंडर प्रक्रीया प्रशासना तर्फे थांबविण्यात आलेली आहे. प्रशासनाने तीन दिवसांची शॉर्ट टेंडर नोटीस काढण्यात यावी.

श्रीमती फिरदोस फातेमा :गेल्या दोन वर्षापासून राममंदिर ते किराडपुरा रस्त्याच्या कामा बाबत सात्यत्याने विषय मांडण्यात येत आहे. खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता(श्री.के.आर.कुलकर्णी) : 22 जानेवारीच्या स्थायी समितीच्या निर्णयानुसार स.नगरसेवक श्री.हिदायत अली व पत्रकांर त्या ठिकाणी आले होते. दि.28 तारखेला नगर रचना विभागाकडुन मार्कींग मिळालेली आहे. परंतु तेथील नागरीकांचा विरोध आहे.

श्रीमती फिरदोस फातेमा :सदर रस्त्याच्या कामासाठी सातत्याने पाठपुरावा होत आहे. मा.सभापती यांनी सदर रस्त्याच्या कामासाठी आदेश दिला होता परंतु काम करण्यात आलेले नाही. स्थायी समितीचे आदेशाचे पालन केलेले नाही. संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :पोलीस प्रोटेक्शन घेऊन तातडीने काम सुरू करण्यात यावे.

उपअभियंता(श्री.के.आर.कुलकर्णी):नगर रचना विभागाने सर्वे क्रमांक 34 व 36 च्या मिळकत धारकाकडुन फेरमोजणी विनंती असुन प्रकरणी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, औरंगाबाद यांना मोजणी करीता पत्र दिले आहे. अद्यापपर्यंत फेर मोजणी झालेली नाही. टि.पी. विभागाने मार्कींग दिल्यास तात्काळ काम करण्यात येईल.

श्री.मीर हिदायत अली : पोलीस बंदोबस्त घेऊन काम करण्यात यावे.

मा.सभापती :आवश्यक पोलीस बंदोबस्त घेऊन काम करण्यता यावे.

श्री.जगदिश सिध्द :1124 कर्मचाऱ्यांना सेवापुस्तक देण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत होते. दोन्ही सभागृहांनी वारंवार या संदर्भात चर्चा झालेली आहे. मा.आयुक्तांनी 1124 च्या संचीकेस मान्यता दिलेली आहे. यासंदर्भात मा.आयुक्त तसेच सर्व संबधीत अधिकारी यांचा अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात येतो.

श्री.मीर हिदायत अली :अनुमोदन करण्यात येते.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :अनुमोदन देण्यात येते.

श्री.त्र्यंबक तुपे :कर्मचाऱ्यांचा महत्वाचा विषय होता. मागील 10 वर्षापासूनचा हा प्रश्न प्रलंबित होता. प्रशासनाने हा प्रश्न मार्गी लावलेला आहे. प्रशासनाला याबद्दल सुभेच्छा देण्यात येते.

मा.सभापती :1024 चा महत्वाचा प्रश्न प्रशासनाने सोडविलेला आहे. सर्व स.सदस्यांनी हा विषयाबद्दल चर्चा केलेली आहे. कर्मचाऱ्यांना न्याय दिलेला आहे. मा.आयुक्त, उपआयुक्त (प्र),आस्थापना अधिकारी-2,मुख्य लेखापरिक्षक,प्रशासनाचे अभिनंदनाचा ठराव घेण्यात येत आहे.

श्री.मीर हिदायत अली :आरोग्य विभागात मेडिकल बील अदाई बाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :कर्मचाऱ्यांचे मेडीकल बील अदाई तात्काळ करण्यात यावी.

श्री.जहॉगीर अब्बास खान :नाल्यावरील अतिक्रमण काढण्याबाबत वारंवार प्रशासनाला विनंती केली परंतु प्रशासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही. 80 फुटाच्या नाल्यावर अतिक्रमण झालेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :संबधीत नाल्याची पाहणी करण्यात आली आहे. ज्यांनी नाला बंद केलेला आहे. त्याचा स्वत:चा प्लॉटचा पीआरकार्ड बनलेले आहे. याबाबतीत कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :नगर रचना विभागाच्या नोंदीनुसार सदरील नाला 80 ते 85 फुटाचा आहे परंतु आजच्या परिस्थीतीत नाला 10 फुटांचा राहिलेला आहे. रेकॉर्डनुसार नाल्याची मार्कींग करून अतिक्रमण काढण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती :चुकीच्या पध्दतीने पीआर कार्ड तयार केले असल्यास प्रशासनाने शहानिसा करून संबधीतावर गुन्हे दाखल करण्यात यावे.

श्री.अनिल जैस्वाल :आंबेडकर चौकात मोठमोठे खड्डे पडलेले आहे काम सुरू करण्यात आले होते. परंतु मध्येच बंद पाडण्यात आलेले आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (श्री.एस.एल.पवार) :व्हाईट टॉपिंगचे काम चालु होते, परंतु इतर ठिकाणचे संबधीताचे काम हाती घेतले आहे. तरी सदरील काम सोमवार पासून सुरू करण्यात येईल. खड्डे वगैरे नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :काही मोजकेच रस्ता तयार करणाऱ्या कंत्राटदारांचे चेक काढण्याचे काम करण्यात येते. बारचार्ट प्रमाणे रस्त्याचे काम करण्यात आले आहे का? याची तपासणी करण्यात यावी. कार्यकारी अभियंता यांचे कंत्राटदारांवर नियंत्रण नाही. वरिष्ठ स्तरावरून चेक काढण्याचे आदेश प्राप्त होतात व परस्पर लेखा विभातुन चेक काढले जातात. सभेपुर्वी रस्त्यांचे काम करण्याचा दिखावा केला जातो. व्हाईट टॉपिंगच्या रस्त्याचे बार चार्ट प्रमाणे काम करण्यात येत नसल्यास दंड लावण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :काही कंत्राटदार रस्त्याचे अनेक कामे एकाच वेळी घेतात त्यामुळे काम होत नाही. नागरीकांना याचा त्रास सहन करावा लागतो.

मा.सभापती :बारचार्ट प्रमाणे काम चालू आहे का? खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता (ई व फ):व्हाईट टॉपिंगचा एकच कंत्राटदार आहे. बारचार्ट प्रमाणे काम झालेले आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :लेमन ट्रि हॉटेल समोरील रस्त्याचे काम बारचार्ट प्रमाणे झालेले असल्याचे सभागृहात पेपर दाखविण्यात यावे. बार चार्ट प्रमाणे काम झालेले नाही. पीएमसी कडुन खुलासा घेण्यात यावा. वार्डातील काम केव्हा सुरू होणार याचा खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (ई व फ) :वेळेवर पेमेंट मिळाल्यास काम गतीने होतील.

श्री.काशिनाथ कोकाटे :संबधीत कंत्राटदाराची काम करण्याची कॅपीसिटी नव्हती तर काम कशासाठी घेण्यात आले. एका रस्त्याचे काम सुरू केल्यास ते पुर्ण करण्यात आले पाहिजे.

श्री.त्र्यंबक तुपे :व्हाईट टॉपिंगच्या सात ते आठ रस्त्याचे काम झाले असते तर शहराचा चेहरा बदलला असता. दुसरा पर्याय शोधण्यात यावा. रस्त्यांचे काम पेमेंटमुळे थांबविणे योग्य नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :लेमन ट्रि समोरील प्रलंबित रस्त्यांचे काम पुर्ण केव्हा होणार ?

कार्यकारी अभियंता (ब व क): लेमन ट्रि जवळील काम सगळयात पहिले सुरू करण्यात आले होते. परंतु काही कारणास्तव काम बंद पडलेले आहे. सोमवार पर्यंत काम सुरू न केल्यास संबधीतावर निश्चित कारवाई केली जाईल.

श्री.त्र्यंबक तुपे :कैलास नगर येथील रस्ता रूंदिकरणात अतिक्रमण काढल्यानंतर त्या ठिकाणी संबधीत रहिवाशांनी उरलेल्या जागेमध्ये दुकाने सुरू केल्या त्या दुकानांना सिल करण्यात आलेले आहे. तेथील रहिवाशी 40 ते 50 वर्षापासून त्या ठिकाणी राहत आहे. त्यांना रजिष्ट्री व इतर कागदपत्र न पाहता आहे त्या परिस्थितीमध्ये त्यांना कशा पध्दतीने मोबदला दिला जाईल मदत केली जाईल याचा विचार व्हावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

करमुल्य निर्धारक व संकलक : वसुली चालु आहे. वसुली समाधानकारक नाही. त्यामुळे व्यवसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई चालु आहे.

मा.सभापती :कैलास नगर ते लक्ष्मणचावडी येथील घरे तुटले ती यादी मालमत्ता विभागाकडे असुन त्यापैकी किती नागरीकांना मोबदला दिला खुलासा करण्यात यावा.

करमुल्य निर्धारक व संकलक:प्रत्येक मालमत्ता धारकांचे जास्तीत जास्त 20 टक्के जागा ताब्यात घेतलेली आहे. ज्यांना प्लॉट दिलेले आहे त्याची यादी बीओटी सेलला आहे. जे एससी, एसटी प्रवर्गात होते त्यांना घरे बांधुन देण्यात आलेली आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :शिल्लक राहिलेल्या जागेत ज्यांच्याकडे कागदपत्र आहेत, बांधकामाची परवानगी देणार आहेत का? की, बांधल्यानंतर सिल केले. संबधीताकडे प्रॉपटी टॅक्स बाकी होते का?

करमुल्य निर्धारक व संकलक :टॅक्स बाकी होता.

श्री.त्र्यंबक तुपे :संबधीतांना वेळ देण्यात यावा.

वार्ड अधिकारी (फ) :आण्णासाहेब बाबुराव घोंगडे यांच्या तीन दुकाना आहेत त्याचा काही भाग रोड वाईडींगमध्ये गेलेला आहे. त्या दुकानांचा सन 1991 पासून बाकी होता एकुण 2 लाख रूपये बाकी होता.

करमुल्य निर्धारक व संकलक:50 टक्के रक्कम भरण्याबाबत कळविण्यात येईल व बाकी रक्कमेसाठी वेळ वाढविण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :सिल करण्यापुर्वी संबधीतांना वेळ देण्यात यावी.

श्री.मीर हिदायत अली :सिटी चौक येथे ब्रिजचे काम चालु केलेले आहे. त्याठिकाणी 5 पोल रोडमध्ये येत आहे. विद्युत विभागाने तात्काळ काम करण्यात यावे.

मा.सभापती :एमएससीबी विभागाकडे जावुन तात्काळ विषय मार्गी लावण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे :सिध्दार्थ उद्यान येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दालनाचे उद्‌घाटन झालेले आहे. सर्व मनपाचे अधिकारी/कर्मचारी वर्गांनी चांगले काम केलेले आहे. मा.पालकमंत्र्यांचे यामध्ये हातभार लागलेले आहे. त्यामुळे या सर्वांचा अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात येतो.

श्री.मीर हिदायत अली :ठरावास अनुमोदन आहे. क्वालिटीवाईझ काम झालेले आहे. उच्च दर्जाचे काम झालेले आहे.

श्री.प्रिती तोतला :मराठवाड्यास या दालनामुळे वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. यास अनुमोदन देण्यात येते.

मा.सभापती :शिवसेना प्रमुख, मा.उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या संकल्पनेतुन मराठवाडा मुक्ती संग्राम दालन सिध्दार्थ उद्यान येथे उभारण्यात आले आहे. मागील दोन वर्षापासून

काम चालु आहे. स.पालकमंत्री श्री.रामदासजी कदम यांनी 5 कोटी रूपये उपलब्ध करून दिला. स्वातंत्र्य सैनिक यांना यामुळे सन्मान प्राप्त झालेला आहे. यामध्ये सर्व अधिकारी पदाधिकारी आणि मा.पालकमंत्र्यांचे अभिनंदन करण्यात येते व ठराव मंजूर करण्यात येतो.

**विषय क्र. 104 :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेअन्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा पशुसंवर्धन विभागांअंतर्गत कार्यान्वीत असलेले पशुवधगृह पडेगाव कत्तलखाना मोठी जनावरांकरीता (बैल,म्हैस,रेडा कत्तल शुल्क वसुली) व लहान जनावरांकरीता शहाबाजार कत्तल खाना (शेळी, मेंढी कत्तल शुल्क वसुली) व्यवस्थापन खर्चामध्ये झालेली वाढ व या योजनेतून मिळणारे उत्पन्न विचारात घेता व या विभागास देण्यात आलेले वसुलीचे आर्थिक उद्दिष्टे लक्षात घेता व सध्याचे मटन/बिफ मांसाचे दर लक्षात घेता वसूल करण्यात येत असलेली कत्तल फिस कमी आहे. तरी खालीलप्रमाणे दरवाढ करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | जनावराचा प्रकार | सध्याचे दर | प्रस्तावित दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01. | मोठी जनावरे - बैल,म्हैस,रेडा | रू.20/- | रू.30/- | -- |
| 02. | लहान जनावरे - शेळी,मेंढी | रू.10/- | रू.20/- | -- |

वरीलप्रमाणे दरवाढ प्रस्ताव मंजुर केल्यास मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :मंजूर करण्यास हरकत नसावी. शहरात इतर ठिकाणी कंटिंग होतात त्यामुळे महानगरपालिकेचे यामध्ये नुकसान आहे. महानगरपालिकेने ज्या दोन ठिकाणी कंटिंगकरीता दिलेले आहे त्याच ठिकाणी हे काम केले जावे जेणे करून महानगरपालिकेचे नुकसान होणार नाही.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :अवैध कत्तल प्रत्येक भागामध्ये शहरात चालु आहे. ती बंद करण्यात यावे जेणे करून उत्पन्नामध्ये वाढ होईल.

श्री.मीर हिदायत अली :एका महिण्यामध्ये किती बकऱ्यांची मनपाच्या कत्तलखाण्यामध्ये कत्तल होते. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

पशुसंवर्धन अधिकारी :शहाबाजार येथे रोज साधारणतः 250 शेळया, मेंढया यांची मनपा कत्तलखाण्यामध्ये कत्तल केली जाते. तसेच पडेगांव कत्तलखाण्यामध्ये साधारणतः 60 ते 70 कत्तल केली जाते. शहरामध्ये अवैध कत्तल केली जात आहे परंतु कर्मचाऱ्यां अभावी नियंत्रण ठेवण्यात अडचणी येतात.

श्री.मीर हिदायत अली :शहरात साधारणतः 2 हजारच्यावर बकऱ्यांची कत्तल केली जाते.

मा.सभापती :विषय मंजूर करण्यात येतो.25 रूपये आणि 15 रूपये दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मनपा पशुसंवर्धन विभागांअंतर्गत कार्यान्वीत असलेले पशुवधगृह पडेगाव कत्तलखाना मोठी जनावरांकरीता (बैल,म्हैस,रेडा कत्तल शुल्क वसुली) व लहान जनावरांकरीता शहाबाजार कत्तल खाना (शेळी, मेंढी कत्तल शुल्क वसुली) येथील कत्तल फि मध्ये खालीलप्रमाणे दरवाढ करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जनावराचा प्रकार | प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजुर केलेले दर |
|---|---|---|---|
| 01. | मोठी जनावरे - बैल,म्हैस,रेडा | रू.30/- | रू.25/- (वीस रूपये) |
| 02. | लहान जनावरे - शेळी,मेंढी | रू.20/- | रू.15/- (पंधरा रूपये) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 105 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- ०१. पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने, **डॉक्टरांचे क्लिनीक**, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कीगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **शैक्षणिक संस्था** :- **अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**ब)** ज्या शैक्षणिक संस्था मध्ये इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज तसेच सर्व विना अनुदानित शाळा, कॉलेज आहेत त्यांना सामान्य कराचा दर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल. तसेच मेडीकल कॉलेज मधील फक्त हॉस्पीटलसाठी वापर होणाऱ्या इमारतींना सामान्य कराचा दर ४५ टक्के आकारण्यात येईल.

०५. **भारत सरकारच्या मिळकती** :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा करारनामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.११२५/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

०७. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे | सध्याचे सामान्य कराचे दर | प्रस्तावित सामान्य कराचे दर |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त 'अ' प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त 'ब' प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त 'क' प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त 'ड' प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

०९. **उपभोक्ता शुल्क** :- घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी मा.सर्व साधारण सभा दि.२६/०९/२०१३ मधील ठराव क्रमांक ३३० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या ठरावात खालील प्रमाणेच्या सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

०१ निवासी वापराच्या मिळकतीच्या कोणत्याही कर योग्य मुल्यावर १० टक्के उपभोक्ता शुल्क हे कमीत कमी रू.३००/- च्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

०२ निवासी वापरा व्यतिरिक्त सर्व मिळकतींच्या कोणत्याही कर योग्य मुल्यावर २० टक्के उपभोक्ता शुल्क हे कमीत कमी रू.५००/- च्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

१०. **नामांतर शुल्क** :- खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| **निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य** | **नामांतर शुल्क** | |
|---|---|---|
| | **(शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी)** | **(शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी)** |
| रू. ०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू. १०,००१/- ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| **औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी** | | |
| रू.०१ ते ५०,०००/- | | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | | रू.७५,०००/- |

११. **विलंब शुल्क** :-

**०१.** ३१ मार्च २०१५पर्यंतच्या एकुण थकबाकीवर १० टक्के विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**०२.** चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अदत्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

१९४९ चे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

**११.१** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७ (अ) नुसार दि.१-४-२००८ पासून अवैध बांधकाम किंवा पूनर बांधकामास तथा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध म्हणून राहील तो पर्यंत वसूल करण्यात येईल.

**१२. विशेष सवलती :-**

**१२.१** पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात एक वर्षाची सूट देण्यात येईल.

**१२.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

**१२.३** जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१५-२०१६ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

| | |
|---|---|
| एप्रिल | १०% |
| मे | ८% |
| जुन | ६% |

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

**१२.४.** आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

**१२.५** जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

**१२.६** जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात ५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

**१२.७** जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

**१३. कर आकारणी प्रणाली :-**

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य

(जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने सन २०१५ च्या शिघ्र शिध्द गणकातील दिलेल्या दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | **सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा प्रचलीत दर /चौ.मी.** | **सन २०१५ च्या विभागानुसार प्रस्तावित मिळकतीचा दर /चौ.मी.** |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते १०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

सिध्द शिघ्र गणक सन २०१५ नुसार शहरातील चार विभागांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता त्यामध्ये सरासरी १७४.६९ टक्के टक्के वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सन २०१४-१५ च्या विद्यमान दरात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी कर आकारणीच्या दरात सरासरी २५ टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**१४. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-**

**१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

**१४.३ (अ) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रतीमाह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

**१४.५ (ब) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

**१४.७ (क) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

**१४.०९ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१४-१५ साठी प्रचलीत दर | सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | ३० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१४-२०१५ साठी प्रचलीत दर व सन २०१५-१६ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१४-१५ साठी प्रचलीत दर | सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| **१०** | उपभोक्ता शुल्क | निवासी वापरासाठी | ७३० प्रती वर्ष | १० % कर योग्य मुल्यांवर कमीत कमी रू.३००/- |
| | | निवासी वापरा व्यतिरिक्त सर्व | ---- | २० % कर योग्य मुल्यांवर कमीत कमी रू.५००/- |

**१६ शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता,सन २०१५-१६ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.काशिनाथ कोकाटे :20 तारखेपुर्वी विषय येणे आवश्यक होता. 720 रूपये अभिभोक्ता कर मध्येच लावण्यात आलेला आहे. 10 बाय 10 चे घर असेल व 5000 स्के.फुटचे घर असल्यासही त्यास 720/- टॅक्स लावण्यात आलेला आहे. छोटया घरांना हा टॅक्स लावणे अन्यायकारक आहे. सिडको मनपामध्ये हस्तांतरणापुर्वी सिडको फक्त सर्विस टॅक्स भरण्यात येत होता. इतर कुठलाही टॅक्स नव्हता. परंतु महानगरपालिकेत आल्यानंतर वेगवेगळे टॅक्सच्या माध्यमातुन टॅक्स लावण्यात येतो. सिव्हरेज टॅक्स वेगळा लावण्यात आला. स्पेक ने मालमत्तांचा सर्वे केला होता. टॅक्स वाढ सुचवितांना सर्व बाबींचा विचार होणे आवश्यक होते. किती प्रॉपर्टीला टॅक्स लावलेला आहे. अनाधिकृत प्रॉपर्टी, गुंठेवारी भाग या बाबत खुलासा करण्यात यावा. मनपाचा नविन मालमत्तांबाबत सर्वे झाला आहे का? अभियंता यांना सर्वे करण्यासाठी नेमण्यात आले होते याबाबत खुलासा करण्यात यावा. मोबाईल टॉवरबाबत खुलासा करण्यात यावा. उपभोक्ता कर एरियावाईझ लावण्यात यावा. 10 बाय 10 च्या घरांना उपभोक्ता कर लावणे अन्यायकारक आहे. सर्वसामान्य नागरीकांचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. सविस्तर या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :अतिशय महत्वाचा विषय स्थायी समितीसमोर आलेला आहे. सविस्तर चर्चा सभागृहासमोर होणे आवश्यक आहे. शहरात एकुण किती मालमत्तां आहे. किती प्रॉपर्टीपर्यंत प्रशासन पोहचलेले नाही. उत्पन्न वाढण्याचे उद्दिष्ट असलेच पाहिजे. वादग्रस्त मालमत्तांना टॅक्सचा प्रश्न प्रलंबित आहे. तो निकाली काढण्यात आला पाहिजे. टॅक्समध्ये 10 टक्के व्याजाचे प्रोव्हिजन आहे का? मा.उच्च न्यायालयाने मध्यंतरी विचाराणा केली होती की, टॅक्स किती वसुल होतो. नागरीक स्वत: टॅक्स भरण्यासाठी येतात परंतु डिमांड वेळेवर जात नाही. डिमांड वेळेवर गेली पाहिजे. रेडी रेकनरचा मुद्दा महत्वाचा आहे. लिजवरील जागा महत्वाच्या आहेत. रिव्हिजन केव्हा केला. एकुण किती टार्गेट ठेवण्यात आले होते. किती संचिका प्रलंबित आहे या बाबींचा खुलासा होणे आवश्यक आहे. टॅक्सचा बोजा सर्वसामान्य नागरीकांना परवडणारा नाही. सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :जे नियमित टॅक्स भरणा करतात त्यांच्यावरच टॅक्सचा बोजा टाकण्यात येत आहे. नविन प्रॉपर्टी शोधुन त्यांना टॅक्स लावला गेला पाहिजे. लाईट बीलाच्या माध्यमातुन शहरात एकुण व्यवसायिक आणि घरगुती मालमत्तांचा शोध लागेल. प्रशासनाने एमएसइबीशी संपर्क साधुन त्या यादी नुसार टॅक्स लावण्यात यावे. जेणे करून उत्पन्नात भर पडेल. कोणताही टॅक्स वाढविण्यात येवु नये.

श्री.मीर हिदायत अली :10 बाय 10 चे घर असेल व 5000 स्के.फुटचे घर असल्यासही त्यास 720/- टॅक्स लावण्यात आलेला आहे. छोटया घरांना हा टॅक्स लावणे अन्यायकारक आहे सर्वसाधारण सभेने 50 पैसे मंजूरी देण्यात आली होते परंतु 2 रूपये प्रमाणे लावण्यात आले. 720/- रूपये लावण्यात आल्यामुळे नागरीकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. 3 ते 3.50 लाख मालमत्ता शहरात आहे. जीटीएलच्या माध्यमातुन प्रत्येक मालमत्तांना टॅक्स लावण्यात यावा. टॅक्समध्ये वाढ करण्यत येऊ नये. धार्मिक स्थळांना ज्या ठिकाणी वापर नाही तेथे टॅक्स लावण्यात येऊ नये. ज्या ठिकाणी व्यवसायिक आहे त्या ठिकाणी टॅक्स लावण्यात यावा.

श्री.संजय चौधरी :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 267 (अ) नुसार अवैध बांधकामावर मालमत्तांच्या दुप्पट शास्ती लावण्यात येते. गुंठेवारी भागातील अनेक मालमत्तांना नियमित करण्यात आलेले आहे. दुप्पट शास्ती लावण्यात आलेली आहे ती कमी केलेली आहे का?

करमुल्य निर्धारक व संकलन:163 मोबाईल टॉवर रेकॉर्डवर होते मोबाईल टॉवरची मोहिम हाती घेतल्यानंतर 373 मोबाईल टॉवर रेकॉर्डवर आले. त्यांना टॅक्स लावण्यात आला. 46 मोबाईल टॉवर अधिकृत आहेत. इतर अनाधिकृत असुन त्यास दुप्पट शास्ती लावण्यात आली. व्यवसायिक प्रापर्टी 19,415 आहे 78 कोटी 90 लाख थकबाकी आहे. रेसिडेन्शीअल प्रॉपर्टी 1,73,443 पैकी 3600 टक्के वसुली आहे. 3व्यवसायिक प्रापॅर्टीची वसुली 25 टक्के आहे. नविन प्रॉपर्टी शोधमोहिम चालू आहे. तसेच रिव्हीजन करून टॅक्स लावण्याची कार्यवाही चालू आहे. धार्मिक स्थळाचा विचार केल्यास पुजा अर्चाचा भाग सोडुन ज्या ठिकाणी व्यवसायिक वापर चालू आहे त्या ठिकाणी टॅक्स लावलेला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :व्यवसायिक प्रॉपर्टीला उपभोक्ता कर लावण्यात आला होता का?

करमुल्य निर्धारक व संकलन:लावण्यात आलेला नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : 10 बाय 10 चे घर असेल व 5000 स्के.फुटचे घर असल्यासही त्यास 720/- टॅक्स लावण्यात आलेला आहे. छोटया घरांना हा टॅक्स लावलेला आहे. हे योग्य नाही. व्यवसायिक प्रॉपर्टीला उपभोक्ता कर लावण्यास मा.सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली नाही का?

करमुल्य निर्धारक व संकलन:जो ठराव झाला होता तो चुकीचा होता म्हणुन ठेवण्यात आला नाही.

श्री.मीर हिदायत अली :मा.सर्वसाधारण सभेने 50 पैसे प्रमाणे निर्णय घेण्यात आला होता मात्र प्रशासनाने 2 रूपये प्रमाणे करण्यात आले. खुलासा करण्यात यावा.

करमुल्य निर्धारक व संकलन:2 रूपये प्रमाणेचा दुरूस्त ठराव मा.सर्वसाधारण सभेकडुन मंजूर करून घेतलेला आहे.

मा.सभापती :घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांनी खुलासा करावा. लावण्यात आला आहे की, नाही.

घनकचरा व्य.प्रमुख :सदरील प्रस्ताव घनकचरा व्यवस्थापन कक्षाकडुन गेलेला नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रस्ताव दुरूस्तीसह उपभोक्ता कराचा प्रस्ताव सभेसमोर आणण्यात यावा.

श्री.त्र्यंबक तुपे		:एकुण मालमत्तांचा विचार केल्यास तसेच मनपाच्या रेकॉर्डवरील मालमत्तांचा विचार केल्यास बरीच तफावत आहे. जी दरवाढ सूचविण्यात आली आहे, ती करण्याची आवश्यकता नाही. जो टॅक्सची भरणा करणाऱ्या नागरीकांवरच भर टाकण्यात येत आहे. डिस्पुट मॅटर सोडविण्यात यावे. नविन मालमत्तांचा सर्वे करून टॅक्स लावण्यात यावे. थकबाकी मालमत्तांचे व्याज माफ करून निर्णय घेतल्यास मोठया प्रमाणात टॅक्स जमा होईल.

श्री.काशिनाथ कोकाटे	:व्याज आकारणी करण्याची कायद्यात तरतुद नाही.

करमुल्य निर्धारक व संकलन	:विलंब शुल्क लावण्यात येते. व्याज आकारणी करण्याची तरतुद आहे.

श्री.त्र्यंबक तुपे		:थकबाकी वसुली करण्यात यावी. सव्वा तीन लाखाच्या मालमत्तां आहेत त्याचा सर्वे करून टॅक्स लावण्यात यावा. प्रस्तावात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सर्व स.सदस्यांनी या संदर्भात मुद्दे मांडले आहेत. नागरीकांवर कुठलाही बोझा पडु नये. ठेवलेला प्रस्ताव सभागृहाला मान्य नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे	:विषय क्रमांक 105 टॅक्सच्या नुतनीकरणा संदर्भातील प्रस्ताव यामध्ये अनेक त्रृटी असुन नविन मालमत्तांचा शोध घेणे आवश्यक आहे. सर्व बाबी पाहता. मा.सर्वसाधारण सभेला 20 तारखेला प्रस्ताव देणे असल्यामुळे टॅक्स वाढ करण्यास नकार असुन यास विरोध आहे. नविन मालमत्तांचा शोध घेऊन टॅक्स लावण्यात यावा. वाढ करण्यास नामंजूरी करण्यात येतात. दूरुस्तीसह कुठलाही प्रकारचा टॅक्स वाढ न करता मा.सर्वसाधारण सभेस पाठविण्यात मान्यता देण्याची सूचना आहे.

मा.सभापती		:प्रत्येक वर्षाला टॅक्स वाढविण्याऐवजी टॅक्सचे नियोजन करून शहरातील मालमत्तांचे रिव्हिजन करण्यात यावे. त्याद्वारे महानगरपालिकेस वर्षाला 500 कोटी रूपये उत्पन्न मिळु शकेल. प्रशासनाने सुचविलेला मालमत्ता करात वाढ ही योग्य वाटत नसल्यामुळे कुठलीही वाढ करण्यात येऊ नये. उपभोक्ता शुल्क निवासी 10 टक्क्या ऐवजी 5 टक्के 300 रूपये ऐवजी 100 रूपये आकारणी करण्यात यावी. वर्ष संपल्यानंतर विलंब शुल्क आकारणी करणे आवश्यक आहे. सहा महीणे थकबाकीच्या प्रत्येक महिण्यासाठी 2 टक्के दंड प्रस्तावित केला आहे तो चुकीचा आहे. तो रद्द करण्यात येतो. विलंब शुल्कावर व्याज आकारणी करण्यात येते ती बंद करण्यात यावी. विलंब शुल्क चालु मागणी बीलामध्ये समाविष्ट असते संगणकाच्या सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करावी. स.सदस्यांची केलेल्या सूचना विचारात घेऊन दुरूस्तीसह विलंब दरानुसार दर आकारणी करून स.सदस्यांनी प्रस्तावात सुचविलेल्या घेऊन दुरूस्ती प्रचलित दरानुसार दर आकारणी करण्यास सन 2015-16 चे दर निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. धार्मिक स्थळांना नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2015-16 या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला निश्चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कर दर निश्चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेला आहे.

- सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रत्येक वर्षाला कराचे दर वाढविण्याऐवजी नियोजनबध्द कार्यक्रम आखून शहरातील सर्व मालमत्तांचे रिव्हीजन करावे. प्रशासनाने मालमत्ता कराच्या दरात सुचविलेली वाढ संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे सन 2015-16 या वर्षासाठी सन 2014-15 चे प्रचलित असलेले दर लागू करण्यास मान्यता देण्यात येते.

- उपभोक्ता शुल्क निवासी वापरासाठी 10% ऐवजी 5% आणि कमीत कमी 300/- ऐवजी 100/- रूपये आकारण्यात यावे.
- वर्ष संपल्यानंतर विलंब शुल्काची आकारणी होणे आवश्यक आहे.
- सहा महिन्याच्या थकबाकीसाठी प्रत्येक महिन्यासाठी 2% दंड प्रस्तावित केला तो चुकीचा आहे. रद्द करण्यात येतो.
- विलंब शुल्कावर देखील व्याज आकारण्यात येते ते बंद करावे.
- विलंब शुल्क चालु मागणीत बीलामध्ये समाविष्ट असते कॉम्प्युटरच्या सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करावी.
- धार्मिक स्थळांच्या संदर्भात नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर केलेल्या सूचना विचारात घेऊन उपरोक्तप्रमाणे दुरूस्तीसह सन 2014-15 चे प्रचलित असलेले दर सन 2015-16 या वर्षासाठी लागू करण्यास मान्यता देण्यात येते. सदर ठराव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 106 :**

संचालक, महानगरपालिका प्राणि संग्रहालय यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन 2015-16 या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणि संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी ई-टेंडरद्वारा निविदा मागविण्यात आल्या असता एकुण चार निविदांची विक्री झाली असून चार भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | दर प्रती किलो रूपये |
|---|---|---|
| 01. | श्री.गफुरमियाँ कुरैशी | 130.00 |
| 02. | श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम | 121.00 |
| 03. | श्री.फेरोज खान रहेमान खान | 125.00 |
| 04. | श्री.अब्दुल हमीद हनीफ कुरेशी | 132.50 |

चार निविदाधारकांपैकी श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम यांचे दर रूपये 121.00 प्रती किलो सर्वात कमी असून निविदाधारकांशी मुख्य लेखाधिकारी यांचेसमवेत चर्चा केल्यानंतर त्यांनी रूपये 105.00 प्रती किलो दराने बीफचा पुरवठा करणेस संमती दिलेली आहे. व या दरास मा.आयुक्त यांनी दिनांक 15/02/2015 रोजी मान्यता दिलेली आहे.

प्राणि संग्रहालयात वाघ, पांढरे वाघ, बिबटे, कोल्हे, लांडगे, तरस, मगर, उदबिल्ले असे एकुण 24 मांसाहारी प्राणी असून केंद्रीय प्राणि संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार प्राण्यांकरीता बीफ खाद्य पुरवठ्यासाठी प्राप्त कमी दराने वार्षीक खर्च रूपये 53,24,130/- अपेक्षित आहे.

तुलनात्मक दरानुसार प्राणिसंग्रहालयातील मांसाहारी प्राण्यांसाठी बीफ खरेदी करीता श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम यांचे दर रूपये 105.00 प्रती किलो सन 2015-16 या कालावधीकरीता विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :ऐनवेळेचे सर्व विषय दुरूस्तीसह मंजूर करण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन 2015-2016 या एका आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका प्राणि संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार श्री.अब्दुल करीम अब्दुल रहीम यांचेकडून रूपये 121 दराऐवजी रूपये 105.00 प्रती किलो सन 2015-16 या कालावधीकरीता खरेदी करणेस व येणारा वार्षीक रूपये 53,24,130/- या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 107 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत खालील नमुद विविध जाहिरात प्रकाराने होणाऱ्या जाहिराती करीता जाहिरात कर आकारणी करीताचे दर विविध प्रकारासाठी स्थान परत्वे वेगवेगळे असे आहे. सदरील दर मा.सर्वसाधारण सभा दि.28/02/2002 विषय क्र.578/8 नुसार मंजुर झालेले आहेत.

सदरील दरवाढी संबंधाने दि.08/08/2014 रोजी मा.स्थायी समिती ठराव क्र.34 अन्वये औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत विविध जाहिरात प्रकाराने होणाऱ्या जाहिराती करीता जाहिरात कर आकारणीच्या दराबाबत सोलापुर, नांदेड महानगरपालिकेचे जाहिरातचे दर मागवुन तुलनात्मकदृष्ट्या सुधारीत प्रस्ताव ठेवण्याबाबत सादर करणे बाबत मंजुरी झाली आहे. अन्य महानगरपालिकेच्या दराशी तुलना केली असता दर कमी असल्याकारणाने प्रस्तावित प्रकरणी मा.सर्वसाधारण सभा दि.28/02/2002 ठराव क्र.578/8 नुसार यापुर्वी मंजुर झालेल्या दरामध्ये 25% वाढ करणेसाठी प्रशासकीय मान्यता झालेली आहे. त्यानुसार जुन्या दरात वर्गवारी नुसार 25% वाढ करणे संबंधी जाहिरात कर आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच जाहिरात फलक नियंत्रण नियम 2003 अन्वये ज्या इमारतीवर जाहिरात फलक (होर्डींग) उभारणे आहे. त्या इमारतीचे बांधकाम परवाना व भोगवटा प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्यादृष्टीने सदरील अटीमध्ये शिथीलता करून या ऐवजी संबंधीत एजन्सी धारकाकडून शपथपत्र घेवुन परवानगी देणे बाबत धोरण निश्चित करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

करीता कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : दुरूस्तीसह मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत विविध जाहिरात प्रकाराने होणाऱ्या जाहिराती करीता जाहिरात कर आकारणीच्या दराबाबत अन्य महानगरपालिकांच्या दराशी तुलना केली असता त्यांचे दर कमी असल्याने प्रस्तावित प्रकरणी मा.सर्वसाधारण सभा दि.28/02/2002 ठराव क्र.578/8 नुसार यापुर्वी मंजुर झालेल्या पुर्वीच्या दरात वर्गवारी नुसार 25% वाढ करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने ज्या इमारतीवर जाहिरात फलक (होर्डींग) उभारणे आहे त्याचे बां. प./भोगवटा प्रमाणपत्राच्या अटीमध्ये शिथीलता देऊन संबंधीत एजन्सी धारकाकडून जबाबादारीसंबंधीचे शपथपत्र घेवुन परवानगी देणेस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. तसेच शहराचे विद्रुपीकरण होऊ नये म्हणुन दि.01 एप्रिल 2015 नंतर दाखल होणाऱ्या प्रस्तावांस नविन परवाना देतांना प्रति होर्डींग रू.2.00 लक्ष अनामत ठेवावी, यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 108 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहराच्या ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे वॉटर टँकर कमी पडत असल्यामुळे एक वर्षा करीता भाडे तत्वावर खाजगी टँकर लावण्यासाठी रक्कम रुपये 7,07,66,200/- चे अंदाज पत्रक सादर करण्यात आले होते. त्यास दिनांक 7.2.2014 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक 510 दिनांक 7.2.2014 नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार सदरील कामा करीता निविदा मागविण्यासाठी अटी/शर्तीसह निविदा तयार करण्यात येत असतांना दिनांक 5.3.2014 ते दिनांक 28.5.2014 या काळात लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागु झाल्यामुळे निविदा मागविता आल्या नाही. आचारसंहिता संपल्या नंतर प्रथमतः ई-टेंडरद्वारे निविदा मागविण्यात आल्या. दिनांक 11.6.2014 रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता वार्ड अ/ड,वार्ड ब/क,वार्ड इ/फ साठी प्रत्येकी तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये फक्त एकच निविदा नियम व अटीनुसार परिपूर्ण असल्यामुळे सात दिवसाची मुदतवाढ देऊन दुस-या वेळेस

फेरनिविदा मागविण्यात आल्या. दिनांक 2.7.2014 रोजी दुस-या वेळेस तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता त्यामध्येही एकच निविदा परिपूर्ण असल्याचे दिसुन आले.

या कामासाठी निविदाधारकांचा कमी प्रतिसाद मिळत असल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी निविदा अटी व शर्ती मध्ये शिथीलता आणुन तिस-या वेळेस फेर निविदा मागविण्यात आल्या. दिनांक 22.7.2014 रोजी तिस-या वेळेस तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता वार्ड अ/ड करीता तीन, वार्ड ब/क करीता चार व वार्ड इ/फ करीता तीन निविदा प्राप्त झाल्या. तिसरी वेळ असल्यामुळे अटी शर्तीनुसार पात्र असलेल्या निविदाधारकांच्या कमर्सियल निविदा दिनांक 28.7.2014 रोजी उघडण्यात आल्या. प्राप्त कमर्सियल निविदामध्ये तुलनात्मकदृष्टया वार्ड अ/ड व वार्ड ब/क, करीता मे. गोल्ड कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांची व वार्ड ई/फ करीता मे. शेख कन्स्ट्रक्शन यांची कमी दराची निविदा प्राप्त झाली. कमी दराच्या निविदेतील दर खालील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **टँकर क्षमता** | **प्रतिदिन फिक्स दर** | **प्रति कि.मी दर** |
|---|---|---|---|
| 1 | 5000 लिटर | रु 1530/- | रु 20.20 |
| 2 | 10000लिटर | रु 2323/- | रु 26.26 |

वरील प्रमाणेच्या दरास मान्यतेसाठी शिफारस करुन प्रस्ताव दिनांक 5.8.2014 रोजी मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला, परंतु मा. स्थायी समितीने सदर विषय मान्यतेसाठी पटलावर घेतला नाही. दरम्यान दिनांक 1.9.2014 रोजी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लि. यांचेकडे पाणी पुरवठा व्यवस्था हस्तांतरीत झाली. त्यामुळे शेवटपर्यन्त मागविलेल्या निविदेच्या दरा प्रमाणे काम होवु शकले नाही.

शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी भाडेतत्वावरील टॅकर करीता मा.स्थायी समिती ठराव क्र.47 दिनांक 4.9.2013 नुसार मे. अमुल लॉरी सर्व्हीसेस औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. .त्यांच्या कामाची मुदत दिनांक 31.3.2014 पर्यन्त होती. दिनांक 1.4.2014 पासुन पुढील एक वर्ष कालावधी करीता भाडे तत्वावरील टँकरच्या कामासाठी उपरोक्त प्रमाणे नमुद केल्या नुसार निविदा कार्यवाही करण्यात आली. परंतु त्यास अंतिम मान्यता न मिळाल्यामुळे व शहरातील नागरिकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्यामुळे दिनांक 1.4.2014 नंतर मे अमुल लॉरी सर्व्हीसेस औरंगाबाद यांचेकडुन मंजुर दराप्रमाणे काम करुन घेण्यात आले.

लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता दिनांक 5.3.2014 पासुन लागु असल्यामुळे प्रथम माहे एप्रिल व मे 2014 या दोन महिन्यासाठी एजन्सीला मुदतवाढ देण्यात आली. दरम्यानच्या काळात औरंगाबाद पाणीपुरवठा योजना सिटी वॉटर युटीलीटी कंपनीकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर होती. त्यात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे कामही औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कडे हस्तांरीत होणार होते. तसेच नवीन कामासाठी निविदा कार्यवाहीही चालु होती. परंतु योजना हस्तांतरण व निविदा कार्यवाहीस विलंब होत गेल्यामुळे वेळोवेळी मे. अमुल लॉरी सर्व्हीसेस औंरगाबाद यांच्या कामास मुदतवाढ देऊन भाडे तत्वावरील टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात आले. दिनांक 1 सप्टेंबर 2014 रोजी योजना औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनीकडे हस्तांतरीत झाल्यामुळे भाडेतत्वावरील टँकर बंद करण्यात आले. मे. अमुल लॉरी सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे मंजूर दर खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **टँकर क्षमता** | **प्रति दिन फिक्स दर** | **प्रति कि.मी.दर** |
|---|---|---|---|
| 1 | 5000 लि. | रु. 1960/- | रु. 26.00 |
| 2 | 10000 लि. | रु. 2960/- | रु. 34.00 |

वरील मंजुर दरानुसार दिनांक 1.4.2014 ते 27.7.2014 या कालावधीत भाडेतत्वावरील वॉटर टँकरच्या किरायापोटी खालील प्रमाणे एकुण रक्कम रु. **21334426** /- खर्च झालेला आहे.

| अ.क्र | माहे | एकुण टँकर | पासुन-पर्यन्त | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | एप्रिल- 2014 | 47 | 1.4.214 ते 30.4.2014. | 5168132.00 |
| 2 | मे.- 2014 | 47 | 1.5.2014 ते 31.5.2014 | 5638548.00 |
| 3 | जुन -2014 | 48 | 1.6.2014 ते 30.6.2014 | 5533834.00 |
| 4 | जुलै -2014 | 48 | 1.7.2014 ते 27.7.2014 | 4993912.00 |
| | | | **एकुण** | **21334426.00** |

वरील प्रमाणे वर्ष 2014 - 15 करीता मागविण्यात आलेल्या निविदामध्ये दिनांक 28/ 7/ 2014 रोजी उघडण्यात आलेल्या कमर्सियल निविदेमध्ये प्राप्त झालेले तुलनात्मकदृष्ठया सर्वात कमी दर हे सध्याच्या मंजुर दरापेक्षा कमी असल्यामुळे सदरील दर आकारुन देयक अदाई करणे योग्य होईल. या दरानुसार दिनांक 28. 7. 2014 ते 31. 8. 2014 या कालावधीत भाडेतत्वावरील वॉटर टँकरच्या किरायापोटी खालील प्रमाणे रक्कम रु. **5008013**/- खर्च झालेला आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | जुलै - 2014 | 48 | 28.7.2014 ते 31.7.2014 | 569907.00 |
| 2 | ऑगस्ट- 2014 | 47 | 1.8.2014 ते 15.8.2014 | 2150111.00 |
| 3 | ऑगस्ट -2014 | 47 | 16.8.2014 ते 31.8.2014 | 2287995.00 |
| | | | **एकुण** | **5008013.00** |

करीता वरील प्रमाणे शहरातील विविध भागात पाणी वितरणासाठी मागील मंजुर दरानुसार मे. अमुल लॉरी सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे मार्फत भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वॉटर टँकरच्या किरायापोटी दिनांक 1.4.2014 ते 31.8.2014 या काळात झालेल्या एकुण रक्कम रुपये 2,63,42,439/-च्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराच्या ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाणी पुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे वॉटर टँकर कमी पडत असल्यामुळे शहरातील विविध भागात पाणी वितरणासाठी मागील मंजुर दरानुसार मे.अमुल लॉरी सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे मार्फत भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वॉटर टँकरच्या किरायापोटी दिनांक 1.4.2014 ते 31.8.2014 या काळात झालेल्या एकुण रक्कम रुपये 2,63,42,439/- च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद